


शम्मी कपूरः जन्टलमन जंगली

★ **नावः** शम्मी कपूर

★ **खरं नावः** शमशीरराज कपूर

★ **वडील-आजोबा-पणजोबाः** पृथ्वीराज-बिजेश्वरनाथ-दीवान केशवमल

★ **मूळ गावः** समुद्री(पंजाब) आता पाकिस्तानात आहे.

★ **जन्मः** २१ ऑक्टोबर, १९३१

★ **जन्मस्थळः** मुंबई

★ **शिक्षणः** न्यू इरा स्कूल, मुंबईहून मॅट्रिक पास. नंतर रुईया कॉलेजमध्ये काही काळ मौजमजा केली.

★ **पहिली नोकरीः** १९४८मध्ये पृथ्वी थिएटरमध्ये ज्युनियर आर्टिस्ट म्हणून महिना ५० रु. पगाराची. ही नोकरी चार वर्षं केली. सोडताना ३००रु. पगार होता.

★ **पहिला सिनेमाः** कारदार फिल्म कंपनीचा *जीवनज्योती*. नायिका चांद उस्मानी, दिग्दर्शक महेश कौल.

★ **इंडस्ट्रीतले सुरुवातीचे चित्रपटः** १९५२पासून १९५५ दरम्यान *रेल का डिब्बा*(मधुबाला), *लैला मजनू*(नूतन), *ठोकर*(श्यामा), *शमा-परवाना*(सुरैया), *हम सब चोर है*(नलिनी जयवंत). शिवाय *मिस कोका कोला, गुल सनोबर, डाकू, कॉफी हाऊस*सारखे चित्रपट करूनही शम्मीला स्टारचा दर्जा मिळाला नव्हता.

★ **विवाहः** १९५५मध्ये प्रसिद्ध अभिनेत्री गीता बालीशी विवाहबद्ध. १९५६मध्ये मुलगा आदित्य राजचा जन्म.

★ **कारकीर्दीला गती मिळालीः** १९५७मध्ये *तुमसा नही देखा* हा पहिला हिट सिनेमा रिलीज झाला. १९५७ ते १९५९ या काळात *दिल दे के देखो, मुजरिम, उजाला, बसंत, प्रीत न जाने रीत*सारखे अनेक हिट चित्रपट दिले.

★ **रंगील्या भूमिकांचा काळः** १९६१मध्ये शम्मीचा *जंगली* हा पहिला 'रंगीन' चित्रपट आला. त्याच वर्षी कांचन या कन्येचा जन्म झाला. १९६० ते १९६४च्या काळात *प्रोफेसर, चायना टाऊन, दिल तेरा दीवाना, कश्मीर की कली, ब्लफमास्टर* आणि *राजकुमार* रिलीज झाले.

★ **अनपेक्षित धक्काः** १९६५मध्ये गीता बालीचं आकस्मिक अवसान झालं.

★ **मार्गक्रमण चालूचः** पत्नीच्या मृत्यूनंतर *तिसरी मंजील, बदतमीज, ॲन इव्हनिंग इन पॅरिस, तुमसे अच्छा कौन है, प्रिन्स, ब्रह्मचारी, पगला कहीं का, अंदाज* असे दखलपात्र चित्रपट दिले.

★ **पहिला फिल्मफेअर पुरस्कारः** १९६८मध्ये *ब्रह्मचारी*साठी श्रेष्ठ अभिनेत्याचा पुरस्कार.

★ **दुसरा विवाहः** भावनगरच्या राजकुमारी नीलादेवीसह.

★ **पुन्हा शोकः** १९७२मध्ये माता-पित्याचं निधन.

★ **धाडसः** *इर्मा ल दाऊ* या फ्रेंच नाटकावर आधारित *मनोरंजन*(संजीवकुमार-झीनत अमान) या सिनेमाची निर्मिती. पण तो चालला नाही. नंतर राजेश खन्ना-सुलक्षणा पंडित अभिनित *बंडलबाज*चं दिग्दर्शन केलं. तोही आपटला. म्हणून दिग्दर्शनाला रामराम ठोकला.

★ **नवा टप्पाः** नायक शम्मीने चरित्र अभिनेता म्हणून काम करायचा निर्णय घेतला. *जमीर, परवरीश, बेताब, शालीमार, विधाता, प्रेम रोग, हीरो, प्रोफेसर प्यारेलाल, मामा-भांजा*सारखे हिंदी, शिवाय अनेक बंगाली आणि तामीळ चित्रपटही केले.

★ **अभिनयाच्या सर्वोच्च शिखरावरः** १९८२मध्ये श्रेष्ठ सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार आणि १९९५मध्ये 'जीवनगौरव' पुरस्कार.

★ **छोट्या पडद्यावरः** झी टीव्हीवर एखादं वर्ष चाललेल्या *चट्टान* मालिकेत अभिनय

★ **संगणकाचं वेडः** भारतात 'इंटरनेट' हा शब्द लोकांनी ऐकलाही नव्हता तेव्हापासून नेटच्या प्रेमात पडलेल्या शम्मी कपूरनी आपली वेबसाईट बनवली. शिवाय भारतात वेब कल्चरला प्रोत्साहन देण्यात त्यांचं मोलाचं योगदान आहे.

★ **सध्या काय चाललंयः** फुफ्फुसात पाणी जमा झाल्याने मरणाच्या दारात गेलेले शम्मी कपूर त्यातून सुखरूप वाचले. आता ते आपल्या आरोग्याची काळजी घेतात. डाएटिशियनच्या सुचनांनुसार आहार घेतात. पूर्वी रात्री दोन-दोन तीन-तीन वाजेपर्यंत नेट सर्फिंग करणारे शम्मीजी आता नियमितपणे दहाच्या ठोक्याला झोपतात आणि सकाळी सात वाजता उठतात.